लोकमत

# हिंदी पदवीधरांना बँकेत संधी : पालवे

कोल्हापूर : हिंदीच्या पदवीधरांना बँकांमध्ये संधी असल्याचे प्रतिपादन बँक ऑफ बडोदाचे उपक्षेत्रीय प्रबंधक डॉ. देवदास पालवे यांनी केले. शिवाजी विद्यापीठात हिंदी पंधरवडा आयोजिला आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रो. डॉ. ए. एम. सरवदे होते. बँक ऑफ बडोदाचे प्रबंधक मोहसिन खान, वरिष्ठ प्रबंधक शरद पाटील, विकास कुटे उपस्थित होते. डॉ. चंदा सोनकर यांनी प्रास्तविक केले. डॉ. विजय सदामते यांनी परिचय करून दिला. विद्यार्थिनी अमृता कांबळे हिने सूत्रसंचालन केले. फरदीन जमादार याने अभार मानले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून स्टार्टअपना प्रोत्साहन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन हे इन्क्युबेशन सेंटर सुरू झाले आहे. सध्या शेती, संगणक, रसायन, आरोग्य, पर्यावरण, अन्न यामधील २७ स्टार्टअप उद्योगांना बळ देण्याचे काम सुरू आहे.

विविध समस्यांवर नावीन्यपूर्ण उत्तरे व समाधान सुचविण्याची संधी 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज' या उपक्रमातून देण्यात आली आहे. इतर विषयांवरील नावीन्यपूर्ण संकल्पना व त्यावरील उद्योगाबाबत केंद्रातून नवयुवकांना संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. निवड झालेल्या स्टार्टअपना महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी, महाराष्ट्र राज्य स्टार्टअप इंडिया केंद्र सरकार, एमएसएमई व इतर शासकीय व खाजगी संस्थांकडून निधी मिळण्याची संधी आहे.

मंथली इनोव्हेशन चॅलेंज उपक्रमांतर्गत जी-२० इन्व्हायरमेंटल 'स्टेनेबिलिटी' बाबतचे फॉर्म भरून घेतले जात आहेत. विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी २५ सप्टेंबरपर्यंत विद्यापीठाच्या वेबसाईटवर गुगल फॉर्म मध्ये भराव्यात व योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे नवोपक्रम, नवसंशोधन व साहचार्य केंद्राचे संचालक प्रा. एम. एस. देशमुख यांनी केले आहे.

पुढारी

# फार्मसी, बीएड., एमएड.च्या परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठांतर्गत उन्हाळी सत्रातील फार्मसी, बीएड., एमएड., मास्टर ऑफ एज्युकेशनच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या. विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी बॅचलर ऑफ फार्मसी, बीएड., एमएड., (एकात्मिक), मास्टर ऑफ एज्युकेशन आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालयांमध्ये व्यवस्थितपणे झाल्या, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

तरुण भारत

# 'कथक आदिकथका'तून शिल्प संस्कृतीचा शोध

कोल्हापूर : 'कथक–आदिकथक' या सुमारे ९० मिनिटांच्या माहितीपटातून भारतीय संस्कृतीत लपलेल्या उमगस्थानांचा शोध मांडला आहे. या माहितीपटाचे सातवे प्रदर्शन नुकतेच शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात कै. ग. गो. जाधव अध्यासनाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते. पुण्याची युवा लेखक–दिग्दर्शक रेवा रावत हिने या माहितीपटाची निर्मिती केली आहे. आभा औटी व सिनेमॅटोग्राफर अनिष फणसळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत याचे प्रदर्शन करण्यात आले. नृत्यशैलीच्या कुशल नृत्यांगना, गुरू रोशन दात्ये यांच्या संशोधनावर हा माहितीपट आधारीत आहे. गुरू दात्ये यांना पुणे येथील भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूटची संशोधनवृत्ती प्राप्त झाली. त्याअंतर्गत त्यांनी कथक या नृत्यशैलीविषयी संशोधन करत भारतीय प्राचीन मंदिरे, बौद्ध स्तूप आदी ठिकाणच्या नृत्य–नाट्य शिल्पाकृतींचा वीस वर्षे अभ्यास केला.